**नियमित दिवाणी दावा क्र. २२५/२०१५**
**निशाणी ३८ खाली आदेश**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये झालेल्या मिळकतीच्या गट क्रमांकामध्ये झालेल्या चुकीच्या दुरूस्तीस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. सदरचा दावा हा निरंतर ताकीद हुकुमासाठी व इतर अनुषंगिक दादींसाठी दाखल करण्यात आलेला आहे. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे वर्णनातील कलम (ब) मध्ये नमुद गट क्र. ७५९, क्षेत्र ० हे. ९३ आर.+पो.ख. ० हे. ०६ आर. एकूण क्षेत्र ० हे. ९९ आर., आकार १ रू. ३१ पै. यापैकी पश्चिमेकडील दक्षिण उत्तर क्षेत्र ० हे. ४६. ५ आर.+पो.ख. ० हे. ०३ आर. एकूण क्षेत्र ० हे. ४९.५ आर, आकार ० रू. ६५ पै., चतु:सिमा :—

पुर्वेस : याच गटातील उर्वरीत क्षेत्र
पश्चिमेस : गट क्र. ७०६
दक्षिणेस : बारागाव पिंप्री रस्ता व गट क्र. ७४२ व ७४३
उत्तरेस : लागून नाला

सदर गट क्र. ७५९ चतु:सिमेतील पश्चिमेस : कट क्र. **७०६** असे नजरचुकीने नमुद झाले असुन त्याऐवजी पश्चिमेस गट क्र. **७६० अशी दुरूस्ती** करण्यास परवानगी मिळावी.

सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादींचे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान होणार नाही, उलटपक्षी दाव्याचे कामकाज गुणवत्तेवर चालण्यास मदत होईल. प्रस्तुत दुरूस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही.

**२.** प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या अर्जास म्हणणे दिले की, वादीचा अर्ज बेकायदेशीर असुन सदर दुरूस्तीमुळे वादीच्या दाव्यात बदल होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा. नोटीसची बजावणी होवून देखील प्रतिवादी क्र. २ व ५ हजर न झाल्यामुळे दावा त्यांच्याविरूद्ध एकतर्फा व प्रतिवादी क्र. ३ आणि ४ यांनी म्हणणे सादर न केल्यामुळे त्यांच्याविरूद्ध विना म्हणणे चालविण्यात आला.

**३.** दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूद्ध निरंतर ताकीद हुकुमासाठी व इतर अनुषंगिक दादींसाठी दाखल केलेला आहे. वादीचा सदरचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही ऊलट दाव्याचे काम सुलभपणे पुढे चालण्यास मदतच होईल. दुरूस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलट अर्ज नामंजुर केल्यास दाव्याची बहुविधता वाढेल. वरील कारणमिमांसेवरून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :—

**आदेश**

१. वादीचा अर्ज प्रतिवादीला खर्च रू. ५००/—(रूपये पाचशे फक्त) देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीला खर्च रक्कम दिल्यानंतर प्रस्तावित दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

सही/—
(श्रीमती के.एस. खांडरे)
२ रे दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सिन्नर

ठिकाण : सिन्नर
दिनांक : १९.०६.२०२३